महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गात पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली-२०१९/प्र.क्र.१७४/सेवा-२

गो.ते.रुग्णालय इमारत संकुल,१० वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ०५ सप्टेंबर, २०१९

वाचा -

१) सा.आ.वि., शासन आदेश क्र. बदली-२०१८/प्र.क्र.१८६/सेवा-२, दि. ३१.०५.२०१८
२) सा.आ.वि., शासन आदेश क्र. विभाचौ-२०१८/प्र.क्र.७४/सेवा-४, दि. २६.०९.२०१८
३) सा.आ.वि., शासन आदेश क्र. विभाचौ-२०१८/प्र.क्र.९७/सेवा-४, दि. १९.०८.२०१९
४) सा.आ.वि., शासन आदेश क्र. विभाचौ-२०१८/प्र.क्र.९७/सेवा-४, दि. १९.०८.२०१९

शासन आदेश-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (६ व्या वेतन अयोगानुसार वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००+ ग्रेड पे रु. ६६००) मधील जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील डॉ. सुशिलकुमार सिताराम वाकचौरे, जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक यांची शासन आदेश दि. ३१.५.२०१८ अन्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, भंडारा येथे प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली होती. तथापि, सदर बदलीच्या ठिकाणी ते रुजू न झाल्याने त्यांना दि. २६.९.२०१८ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते. सदर निलंबन संदर्भ क्र. ३ च्या आदेशान्व्ये रद्द करण्यात आले आहे. तसेच त्यांचे विरुध्दची विभागीय चौकशी संदर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये बंद करण्यात आली आहे. त्यानुसार डॉ. सुशिलकुमार सिताराम वाकचौरे, तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक यांची प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र नाशिक या पदावर पुर्नःस्थापने अंती पदस्थापना करण्यात येत आहे.

२. सदर आदेश महाराष्ट्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) आणि कलम ४(५) च्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. डॉ. सुशिलकुमार वाकचौरे यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होऊन त्याबाबतचा अनुपालन अहवाल आरोग्य सेवा संचालनालयास तसेच शासनास सादर करावा.

४.   सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०५१५५१२६२७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, serialNumber=9ab69d6945f8950a9525831f8ae9726be295d17576e78d19fa8f6cb952bb04a0, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2019.09.05 17:20:24 +05'30'

(वि. पुं. घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
३) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई
४) उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ नाशिक
५) प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र नाशिक
६) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
८) जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
९) मा. मंत्री (आरोग्य) / मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
१०) प्रधान सचिव (आरोग्य व कु.क.) यांचे स्वीय सहाय्यक
११) डॉ. सुशिलकुमार सिताराम वाकचौरे, तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक
(व्दारा संचालक,आरोग्य सेवा, मुंबई यांचेमार्फत)
१२) निवडनस्ती (सेवा - २)